प्रकरण चौथे

वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर - एक अभ्यास

प्रकरण चौथे

वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर - एक अभ्यास

४.१ प्रस्तावना

४.२ कर्ज वाटप

४.३ कर्ज वाटप आणि उद्योग

१) कर्ज वाटप व चर्मोद्योग
२) कर्ज वाटप व कुंभार उद्योग
३) कर्ज वाटप व सुतार-लोहार उद्योग
४) कर्ज वाटप व वास उद्योग
५) कर्ज वाटप व वेत व बांबू उद्योग
६) कर्ज वाटप व इतर उद्योग

अ) लोकर उद्योग
ब) ग्रामीण तेल उद्योग
क) धान्य डाळी प्रक्रिया उद्योग

४.४ कर्ज वाटप कमी होण्याची कारणे

४.५ उद्योगाप्रमाणे कर्ज वाटपाची वैशिष्ट्ये

४.५.१ चर्मोद्योग व कर्ज वाटप

४.५.२ कुंभार उद्योग व कर्ज वाटप

४.५.३ सुतार-लोहार उद्योग व कर्ज वाटप

४.५.४ वास उद्योग व कर्ज वाटप

४.५.५ वेत व बांबू उद्योग व कर्ज वाटप

४.५.६ इतर उद्योग व कर्ज वाटप

४.६ कर्ज वसुली

४.६.१ प्रस्तावना

४.६.२ तक्ता क्रमांक ४.२ ची वैशिष्ट्ये

४.६.३ उद्योगाप्रमाणे कर्ज वसुलीची वैशिष्ट्ये

अ) चर्मोद्योग व कर्ज वसुली
ब) कुंभार उद्योग व कर्ज वसुली
क) सुतार-लोहार उद्योग व कर्ज वसुली
ड) वास उद्योग व कर्ज वसुली
इ) वेत व बांबू उद्योग व कर्ज वसुली
फ) इतर उद्योग व कर्ज वसुली

४.७ येणे बाकी

४.७.१ प्रस्तावना

४.७.२ तक्ता क्रमांक ४.३ ची वैशिष्ट्ये

४.७.३ उद्योगाप्रमाणे येणेबाकीची वैशिष्ट्ये

अ) चर्मोद्योग व येणे बाकी
ब) कुंभार उद्योग व येणे बाकी
क) सुतार-लोहार उद्योग व येणे बाकी
ड) वास उद्योग व येणे बाकी
इ) वेत व बांबू उद्योग व येणे बाकी
फ) इतर उद्योग व येणे बाकी

४.८ थकबाकी

४.८.१ प्रस्तावना

४.८.२ तक्ता क्रमांक ४.४ ची वैशिष्ट्ये

४.८.३ उद्योगाप्रमाणे थकबाकीची वैशिष्ट्ये

अ) चर्मोद्योग व थकबाकी
ब) कुंभार उद्योग व थकबाकी
क) सुतार-लोहार उद्योग व थकबाकी
ड) वास उद्योग व थकबाकी
इ) वेत व बांबू उद्योग व थकबाकी
फ) इतर उद्योग व थकबाकी

४.९ मूल्यमापन

प्रकरण चौथे

वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ मर्यादित, इस्लामपूर - एक अभ्यास

४.१ प्रस्तावना :

" वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ, मर्यादित इस्लामपूर " या संघाची स्थापना ३१ जुलै, १९७२ मध्ये झाली. वाळवा तालुक्यातील बारा बलुतेदारांना मदत करण्याच्या भूमिकेतून, त्यांच्या अंगी असणाऱ्या कसबांचा त्यांना लाभ करून देण्याच्या भूमिकेतून वाळवा संघाची स्थापना करण्यात आली. सहकारी चळवळीमार्फत ग्रामीण भागाचा विकास करणे, दुर्बल घटकांना सहाय्य करणे व त्यांचा विकास साधणे या भूमिकेतून संघाची वाटचाल चालू आहे. या संशोधनाच्या निमित्ताने १९७२ ते १९९२ (३१-३-१९९२) या २० वर्षांतील संघाच्या कामगिरीचा आढावा घेणे हा प्रमुख उद्देश आहे. या कालखंडातील संघाची प्रगती पाहताना संघाने केलेले कर्जवाटप, कर्जवसुली, येणेबाकी, थकबाकी, अनुदाने इत्यादी बाबींचा आढावा घेणार आहोत. नाबार्ड आकृती बंधाप्रमाणे (संदर्भ - प्रकरण दोन मधील २.३) जरी वेगवेगळ्या ३९ उद्योगांना आर्थिक सहाय्याचा आकृतिबंध दिला असला तरी वाळवा तालुका संघाने प्रामुख्याने आठ उद्योगांना कर्जपुरवठा केला आहे. यामध्ये चर्मोद्योग, कुंभार उद्योग, सुतार-लोहार उद्योग, वास्त उद्योग, वेत व बांबू उद्योग, लोकर उद्योग, ग्रामीण तेल उद्योग व धान्य डाळी प्रक्रिया उद्योग या उद्योगांचा समावेश होतो. या प्रकरणात वरील बाबींचा सविस्तर अभ्यास करणार आहोत.

४.२ कर्जवाटप :

या ठिकाणी १९७२-७३ ते १९९१-९२ या काळात वर उल्लेख केलेल्या उद्योगांना केलेला कर्जपुरवठा त्या प्रत्येक उद्योगातील किती सभासद व्यक्तींना त्याचा लाभ झाला आहे, प्रतिवर्षी किती सभासदांना व किती रुपये कर्जवाटप

झाले आहे ही माहिती गोळा केलेली आहे. तक्ता क्रमांक ४.१ मध्ये कर्ज-वाटपाची सविस्तर माहिती दिली आहे. तक्ता क्रमांक ४.१ पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्रमांक ४.१

संघाने केलेले कर्ज वाटप व सभासद संख्या (१९७२-७३ ते १९९१-९२)

(आकडे रुपयात)

वर्ष	उद्योगाचा प्रकार						
	चर्मोद्योग	कुंभार उद्योग	सुतार-लोहार उद्योग	वस्त्र उद्योग	वेत व बांबू	इतर उद्योग	एकूण
१९७२-७३	३,७०० (८)	२,५०० (५)	३,५०० (७)	१६,८५० (३८)	२५० (१)	-	२६,८०० (५९)
१९७३-७४	३१,३४० (६४)	१०,५०५ (२३)	१२,७९० (२७)	८६,४४२ (१९१)	६,००० (२४)	५०० (१)	१,४७,५७७ (३३०)
१९७४-७५	५६,३५६ (११४)	२७,३७८ (२५)	२४,६४५ (२५)	१,११,६२७ (२४०)	९,५६० (४४)	५०० (१)	२,३०,०६६ (४४९)
१९७५-७६	१,०५,५२४ (२०४)	३५,२५० (७१)	३२,८०० (७२)	१,२३,४७२ (२७२)	१३,९१० (६१)	२,३०७ (४)	३,१३,२६३ (६८४)
१९७६-७७	१,२५,९३३ (२६६)	६१,९५५ (१०६)	४३,५०५ (९१)	१,१२,०७३ (२७३)	१५,०३० (५३)	२,६०० (४)	३,६१,०९६ (७९३)
१९७७-७८	१,३८,४४३ (२५७)	५२,३४५ (९४)	४९,०९९ (१२२)	१,०८,६९२ (२७७)	११,०४० (४८)	२,९०० (७)	३,६२,५१९ (८०५)
१९७८-७९	१,२५,७६८ (२३३)	८४,१६५ (१११)	५१,१५४ (१२६)	१,०२,०९० (२५८)	८,९५० (४५)	३,२२० (७)	३,७५,३४७ (७८०)
१९७९-८०	९५,७४९ (२०१)	८२,३९५ (१२०)	४२,७१९ (९८)	९१,३४३ (२४२)	८,२४५ (३६)	३,२२० (७)	३,२३,६७१ (७०४)
१९८०-८१	८,६७८ (१६३)	७९,०९२ (१०३)	३६,०३४ (७९)	८६,०२७ (२२०)	७,६७५ (३४)	३,२१३ (८)	२,९४,७१९ (६०७)
१९८१-८२	५६,३२३ (९५)	८०,६८२ (७७)	३२,०६० (६४)	८४,७३२ (२१८)	७,९७५ (३२)	३,४९२ (८)	२,६५,२६४ (४९४)
१९८२-८३	१,३८,००६ (२१८)	१,४१,५०२ (११६)	४३,१४९ (७७)	९१,४२० (३१६)	७,६६५ (४०)	२,६५० (८)	४,२४,३९२ (७७५)
१९८३-८४	९६,२२४ (१६३)	१,२६,४२१ (८३)	४८,५२२ (७१)	७४,५४४ (२३३)	७,३०७ (३४)	२,६०० (७)	३,५६,६१८ (५९१)
१९८४-८५	२,३०,८९९ (२२८)	३,००,२२५ (१५१)	९५,४१३ (९६)	८४,७७१ (२२४)	९,१०३ (३६)	२,६०७ (७)	७,२३,०१८ (७४२)
१९८५-८६	२,२६,९८० (१९६)	३,१९,८४१ (११७)	९३,५२१ (८१)	९२,५९० (२३७)	१८,४६५ (३६)	१,६६७ (४)	७,५३,०६४ (६७१)
१९८६-८७	१,०७,३६१ (१६१)	३,२२,४०३ (११२)	१,०१,३५१ (७३)	९१,०९७ (२२४)	१८,४९७ (३४)	२,१६७ (५)	६,४२,८७६ (६०९)
१९८७-८८	२,२६,३१७ (१७४)	२,३०,७२० (८७)	१,११,८३६ (७८)	८४,३५४ (२३७)	१४,८२१ (३२)	२,१६७ (५)	६,७०,२१५ (६१३)
१९८८-८९	१,८३,८४६ (१४८)	१,८२,९१७ (७०)	९३,००५ (७२)	७९,९५१ (२१०)	१४,२७७ (३४)	२,१६७ (५)	५,५६,१६३ (५३९)
१९८९-९०	१,३६,२७२ (१०८)	१,६२,३८६ (६४)	७६,६०८ (६३)	७४,४११ (१९४)	१०,५१८ (२३)	२,१६७ (५)	४,६२,३६२ (४५७)
१९९०-९१	१,४८,८४५ (१६)	२,८१,५०० (१२)	५,३०० (२)	-	-	-	४,३५,६४५ (३०)
१९९१-९२	६५,७६० (५)	४,६२,५२० (१७)	७७,५०० (६)	-	-	-	६,०५,७८० (२८)
एकूण :	२३,८,३२४ (३०२२)	३०,४६,७०२ (१५६४)	१०,७४,५११ (१३३०)	१५,९७,४८६ (४१०४)	१,८९,२८८ (६४७)	४०,१४४ (९३)	८३,३०,४५५ (१०,७६०)

(कंसातील आकडे सभासद संख्या दर्शवितात)

आधार : कार्यालयीन कागदपत्रे

तक्ता क्रमांक ४.१ ची वैशिष्टये पुढीलप्रमाणे विशद केली आहेत.

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील कर्जवाटपाची रचना पाहिल्यास एकूण कर्जवाटप रु. ८३,३०,४५५ झाले असून त्याचा लाभ १०,७६० सभासदांना मिळाला आहे. संघातून कर्जवाटप प्रारंभ दिनांक २-६-१९७३ पासून झाला आहे.

२) वरील काळातील उद्योगाप्रमाणे कर्जवाटप पाहिल्यास त्याची टक्केवारी पुढीलप्रमाणे दिसून येते.

अनु.	उद्योग	एकूण कर्जवाटप	टक्केवारी
१.	चर्मोद्योग	२३,८२,३२४	२८.५९
२.	कुंभार उद्योग	३०,४६,७०२	३६.५७
३.	सुतार-लोहार उद्योग	१०,७४,५११	१२.९८
४.	वाख उद्योग	१५,९७,४८६	१९.१७
५.	वेत व बांबू उद्योग	१,८९,२८८	२.२७
६.	इतर उद्योग	४०,१४४	०.४८
	एकूण :	८३,३०,४५५	१००.०६

वरील कोष्टक पाहिल्यास स्पष्टपणाने दिसणारी बाब म्हणजे सर्वाधिक कर्जवाटप कुंभार उद्योगास झाले असून ते रु. ३०,४६,७०२ इतके आहे. एकूण कर्जवाटपाशी हे प्रमाण ३६.५७ टक्के इतके पडते. याउलट वेत व बांबू या उद्योगाला केलेले कर्जवाटप फक्त रु. १,८९,२८८ असून त्याची टक्केवारी फक्त २.२७ आहे. जर कुंभार उद्योग व चर्मोद्योग यांची एकत्रित बेरीज केली तर ते प्रमाण ६५.१६ टक्के इतके येते. एकूण कर्जवाटपात या दोन उद्योगांचा प्रभाव फार मोठया प्रमाणावर जाणवतो. या उद्योगांनी जवळ जवळ $\frac{२}{३}$ कर्जवाटपाची रक्कम मिळविली आहे. इतर उद्योगांसाठी केलेले कर्जवाटप अत्यंत नगण्य म्हणजे ते ०.४८ टक्के इतके आहे.

३) उद्योगाप्रमाणे सभासद संख्या पाहिल्यास त्यांची टक्केवारी पुढीलप्रमाणे दिसून येते.

अनु.	उद्योग	एकूण सभासद	टक्केवारी
१.	चर्मोद्योग	३०२२	२८.०८
२.	कुंभार उद्योग	१५६४	१४.५३
३.	सुतार-लोहार उद्योग	१३३०	१२.३६
४.	वाख उद्योग	४१०४	३८.१४
५.	वेत व बांबु उद्योग	६४७	६.०१
६.	इतर उद्योग	९३	०.८६
	एकूण :	१०७६०	९९.९८

वरील कोष्टकातील उद्योगांप्रमाणे सभासदांची टक्केवारी पाहिल्यास चर्मोद्योग व वाख उद्योग यांची टक्केवारी ६६.२२ इतकी असून इतर उद्योगांच्या एकत्रित टक्केवारीपेक्षा सभासद संख्या जास्त आहे याचा अर्थ या दोन उद्योगातील सभासद संख्या इतर सर्व उद्योगांच्या एकत्रित सभासद संख्येपेक्षा जास्त आहे.

४) अभ्यासाच्या काळातील एकूण कर्जवाटपाची आकडेवारी पाहिल्यास जास्तीतजास्त कर्जवाटप हे रु. ७,५३,०६४ असून त्याचा फक्त ६७१ सभासदांना लाभ झाला आहे. हे कर्ज वाटप १९८५-८६ या वर्षातील आहे. या उलट कमीतकमी कर्जवाटप रु. २६,८०० असून त्याचा लाभ ५९ सभासदांना झाला आहे. हे कर्ज वाटप १९७२-७३ या वर्षातील आहे.

५) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील सभासद संख्या पाहिल्यास सर्वात जास्त सभासद संख्या ८०५ असून त्याना रु. ३,६२,५१९ कर्ज वाटप झाले आहे. ही सभासद संख्या १९७७-७८ या वर्षातील आहे तर कमीतकमी सभासद

संख्या २८ असून त्यांना कर्ज वाटप मात्र रु. ६,०५,७८० इतके जास्त झाले आहे. ही सभासद संख्या १९९१-९२ या वर्षातील आहे.

६) एकूण कर्ज वाटप विचारात घेतल्यास सरासरी कर्ज वाटप रु. ४,१६,५२३ इतके आहे. एकूण कर्ज वाटप व एकूण वर्षे यांच्याशी ही सरासरी निगडीत आहे.या उलट सभासद संख्येचा विचार केल्यास संघाच्या एकूण कर्ज वाटपातील सरासरी सभासद संख्या ५३८ इतकी आहे.

७) या काळातील उद्योगाप्रमाणे एकूण कर्ज वाटपाची रचना पाहिल्यास कर्ज वाटपात कुंभार उद्योगाचा प्रथम क्रमांक लागतो. तर चर्मोद्योगाचा दुसरा क्रमांक लागतो. या उद्योगांना अनुक्रमे रु. ३०,४६,७०२ व रु.२३,८२,३२४ इतके कर्ज वाटप झाले आहे.

८) सन १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील उद्योगाप्रमाणे एकूण कर्ज वाटप पाहिल्यास वाख उद्योगाचा तिसरा क्रमांक लागतो. या उद्योगास रु. १५,९७,४८६ कर्जवाटप झाले असून त्या पाठोपाठ चौथा क्रमांक सुतार-लोहार उद्योगाचा आहे. या उद्योगास रु. १०,७४,५११ कर्ज वाटप झाले आहे. वेत व बांबू उद्योगाचा पाचवा क्रमांक असून या उद्योगास रु. १,८९,२८८ कर्ज वाटप झाले आहे. कर्ज वाटपात सर्वात कमी कर्ज वाटप इतर उद्योगांना (धान्य व डाळी प्रक्रिया उद्योग ग्रामीण तेल उद्योग व लोकर उद्योग) झाले. असून या उद्योगास रु. ४०,१४४ कर्जवाटप केले आहे.

९) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील उद्योगाप्रमाणे एकूण सभासद संख्या पाहिल्यास क्रमाकुसार वाख उद्योग - ४,१०४, चर्मोद्योग - ३,०२२, कुंभार उद्योग - १,५६४, सुतार-लोहार उद्योग - १,३३०, वेत व बांबू उद्योग - ६४७ व इतर उद्योग - ९३ अशी दिसून येते तर प्रत्येक वर्षातील सरासरी कर्ज वाटप पाहिल्यास जास्तीतजास्त सरासरी कर्ज वाटप हे १९९१-९२ या वर्षातील असून ते रु. २१,६३५ आहे तर कमीतकमी सरासरी

कर्ज वाटप १९७३-७४ या वर्षातील असून ते रु. ४४८ इतके आहे. कर्ज वाटपाची ही सरासरी त्या त्या वर्षांची सभासद संख्या व त्या त्या वर्षांचे कर्ज वाटप यांच्याशी निगडीत आहे.

१०) एकूण कर्ज वाटप रु. ८३,३०,४५५ असून एकूण कर्ज वसुली रु. २३,८५,०१५ आहे. कर्ज वसुलीचे कर्ज वाटपाशी प्रमाण ३४९.२८ इतके आहे.

४.३ कर्ज वाटप आणि उद्योग :

१९७२-७३ ते १९९१-९२ या काळात संस्थेकडून कोणत्या कारणासाठी कर्ज दिले जाते याचा उद्योगाप्रमाणे तपशील पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

१) कर्ज वाटप व चर्मोद्योग -

संस्थेकडून या उद्योगास दोन प्रकारच्या उद्योगांना कर्ज वाटप केले जाते. ते दोन प्रकारचे उद्योग पुढीलप्रमाणे विशद केले आहेत.

अ) चप्पल तयार करणे -

चर्मोद्योगातील कारागिरांना चप्पल तयार करण्यासाठी स्थिर भांडवलाकरिता रापी, हातोडा इ. वस्तू खरेदी करणेकरिता तर खेळते भांडवलाकरिता कातडी खरेदी करणेसाठी कर्ज वाटप केले जाते. या उद्योगातून चप्पल तयार करणे बरोबरच कातडी पिशव्या, सापटया, वादया, वेगवेगळी कातडी आवरणे (उदा. रेडिओ कव्हर्स), जनावरांच्या कातडी म्होरक्या इ. वस्तू तयार केल्या जातात. या प्रकारातील कर्ज वाटप प्रामुख्याने चांभार समाजातील कारागिरांना केले जाते.

ब) कातडी कमविणे -

चर्मोद्योगातील कर्ज वाटापाच्या या प्रकारातील कारागिरांना चप्पल तयार करणाऱ्या कारागिरापेक्षा कमी कर्जवाटप झाले आहे. या प्रकारातील कर्ज वाटप डोर समाजातील कारागिरांना केले जाते. या प्रकारातील कर्ज वाटप

स्थिर भांडवल म्हणून शेड बांधणे, कुंड बांधणे आणि खेळते भांडवलासाठी कातडी, बाभुळ, साल, हिरडा (एकप्रकारची वनस्पती), चुना इत्यादी वस्तू खरेदीसाठी केले जाते.

२) कर्ज वाटप व कुंभार उद्योग -

कुंभार उद्योगास चर्मोद्योगाप्रमाणेच संघाकडून दोन प्रकारच्या उद्योगासाठी कर्ज वाटप केले जाते. ते दोन प्रकार पुढीलप्रमाणे स्पष्ट केले आहेत.

अ) पारंपारिक मातीची भांडी तयार करणे -

कुंभार उद्योगातील कारागिरांना मातीची भांडी तयार करणेसाठी जे कर्ज वाटप केले जाते ते स्थिर भांडवल म्हणून (हत्यारे, अवजारे) मशिनरी, विद्युतचलीत चाक, भट्टी (आवा), शेड, साचे इत्यादीसाठी कर्ज वाटप केले जाते. या प्रकारातील उद्योगातून गाडगी, मडकी, डेरे, रांजण, मूर्ती इत्यादी वस्तू तयार केल्या जातात. घोडयाची लिद, रंग व इतर कच्चामाल खरेदीसाठी खेळते भांडवलासाठी कर्ज पुरवठा केला जातो.

ब) विटा तयार करणे -

संघातून कुंभार उद्योगातील या प्रकारासाठी केलेला कर्ज पुरवठा पारंपारिक उद्योगापेक्षा जास्त आहे. या उद्योगात स्थिर भांडवलासाठी खोरी, टिकाव, पाटया, विटाळ, ताडपदरी, चाळणी इत्यादी वस्तू खरेदी करणे करण्यासाठी कर्जवाटप केले जाते. खेळते भांडवलासाठी जो कर्ज पुरवठा केला जातो तो माती, भुस्सा (बगॅस), शेंगाची टरफले, दगडी कोळसा, मळी इ. वस्तू खरेदीसाठी केला जातो. कुंभार उद्योगातील कर्ज वाटप कुंभार समाजातील कारागिरांनाच केले जाते.

३) कर्ज वाटप व सुतार-लोहार उद्योग -

संघाकडून सुतार व लोहार यांना एक उद्योग म्हणून कर्ज पुरवठा केला आहे. सुतार-लोहार उद्योगात सुतार वर्गास जास्त कर्ज वाटप झाले आहे. सुतार

उद्योगास स्थिर मांडवलासाठी वाकस, करवत, रंधा, सामता, कु-हाड, पटाशी, किकर, गिरमीट, गुण्या (मार्किन्ग गेज), हातोडा, चिरणे इ. वस्तू खरेदी करणेसाठी तर खेळते मांडवलासाठी लाकूड खरेदीसाठी कर्जपुरवठा केला जातो.

लोहार उद्योगास स्थिर मांडवलासाठी ऐरण, घण, छिन्नी, हातोडा, माता, सांडशी इ. वस्तू खरेदीसाठी तर खेळते मांडवलासाठी लोखंड व इतर कच्चामाल खरेदीसाठी कर्जपुरवाठ केला जातो.

४) कर्जवाटप व वास उद्योग -

संधाकडून या उद्योगास स्थिर मांडवलासाठी कोयता, रहाट, पिळण्या, चक्र, रोप, कलबूत, फळी इ. वस्तू खरेदी करणेसाठी कर्जपुरवठा केला जातो. खेळते मांडवलासाठी धायपात (केकती) व वास खरेदीसाठी कर्ज पुरवठा केला जातो. वास उद्योगातील कर्ज वाटप हे प्रामुख्याने मांग समाजातील कारागिरांना केले जाते.

५) कर्ज वाटप व वेत व बांबू उद्योग -

संधाकडून या उद्योगास स्थिर मांडवलाकरिता कोयता खरेदीसाठी तर खेळते मांडवलाकरिता टोपल्या, सूप, बास्केट, हौद (कर्निंग), खुर्च्या, टेबे, पाटया, शोभेच्या वस्तू तयार करण्यासाठी लागणारा कच्चामाल खरेदीसाठी कर्जवाटप केले जाते. या उद्योगातील कर्ज वाटप प्रामुख्याने बुरुड, कैकाडी समाजातील कारागिरांना केले जाते.

६) कर्ज वाटप व इतर उद्योग -

इतर उद्योगात पुढील उद्योगांचा समावेश अभ्यासाच्या सोयीसाठी केला आहे. त्याचे विश्लेषण पुढीलप्रमाणे विशद केले आहे.

अ) लोकर उद्योग -

संघाकडून या उद्योगास स्थिर भांडवलासाठी माग, रहाट, कात्री, टक्ली इ. वस्तू खरेदीसाठी तर खेळते भांडवलासाठी धोंगडी, स्वेटर, मफलर इ. वस्तू तयार करणेसाठी लागणारे सूत व लोकर खरेदीसाठी कर्ज वाटप केले जाते. या उद्योगास संघाकडून अल्प प्रमाणात कर्ज पुरवठा केला आहे. कारण या उद्योगातील कर्ज पुरवठा प्रामुख्याने धनगर किंवा कुंभार समाजातील कारागिरांना केला जातो व हा समाज वर्षातील काही महिने भटकंती करतो म्हणजे तो वर्षभर स्थिर रहात नाही.

ब) ग्रामीण तेल उद्योग -

या उद्योगास स्थिर भांडवलासाठी लाकडी तेलघाणा खरेदीसाठी तर खेळते भांडवलाकरिता शेंग, करडी इ. तेलबिया खरेदीसाठी कर्ज वाटप केले जाते. याही उद्योगास नगण्य स्वरूपाचे कर्ज वाटप झाले आहे. कारण आधुनिक यंत्रसामुग्रीचा वापर या व्यवसायात वाढला आहे. याशिवाय हा व्यवसाय तेली समाजाशी निगडीत असला तरी तो खाजगी क्षेत्रात ही मोठया प्रमाणावर केला जातो.

क) धान्य डाळी प्रक्रिया उद्योग -

संघातून या उद्योगास झालेले कर्ज वाटप अत्यंत अल्प प्रमाणात आहे. या उद्योगात स्थिर भांडवलाकरिता भट्टी, शेड,बांधणेसाठी तर खेळते भांडवलाकरिता दाळे, मुरमुरे, फुटाणे, वाटाणे, लाखा, पापड, बेकरी (पाव) इ. वस्तू तयार करण्यासाठी लागणारा कच्चामाल खरेदीसाठी कर्ज वाटप केले जाते.

४.४ कर्ज वाटप कमी होण्याची कारणे :

१९७२-७३ ते १९९१-९२ या काळात संघाकडून प्रामुख्याने आठ उद्योगांना कर्ज वाटप झाले आहे. कर्ज वाटप कमी होण्याची कारणे पुढील प्रमाणे विशद केली आहेत.

१) कर्ज वाटपाची पध्दत :

संघाकडून कारागिरांना प्रत्यक्ष कर्ज पुरवठा केला जात नाही. कारागिरांना कर्ज वाटप करण्यासाठी संघाकडून कारागिराचा कर्ज मागणी अर्ज जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेकडे पाठविला जातो. कर्ज मंजुरी नंतर ही कारागिरास प्रत्यक्ष कर्ज पुरवठा होत नाही. कर्ज मंजूर झाल्यानंतर त्या कारागिरास स्वत:च्या गावी असलेल्या बँकेत अथवा बँक सेवा उपलब्ध नसल्यास जवळच्या गावातील बँकेत स्वत:च्या नावे खाते सुरू करावे लागते. कर्जाची रक्कम त्या खात्यावर खाते नंबर संघात दिल्यानंतर जमा होते व त्यानंतर त्या कारागिरास कर्जाची रक्कम मिळते. सर्वसाधारण कर्ज वाटपाची पध्दत ही अप्रत्यक्ष स्वरूपाची असल्यामुळे कमी कर्ज वाटप झाले आहे. इतर उद्योगातील उद्योगांना नगण्य स्वरूपाचे कर्ज वाटप झाले आहे. विशेषत: धान्य डाळी प्रक्रिया उद्योगास फक्त रु. ५००-०० व एकाच सभासदास कर्ज पुरवठा झाला आहे तो १९७६-७७ या वर्षी आहे.

२) कर्ज वसुलीची पध्दत :

कर्ज वाटपाप्रमाणेच कर्ज वसुलीची पध्दत अप्रत्यक्ष स्वरूपाची आहे. कर्जदार सभासदांना कर्जफेड करतेवेळी कर्ज भरणा करण्यासाठी संघातून भरणा रकमेची पावती (स्लीप) घेऊन संबंधित बँकेस द्यावी लागते. कर्ज भरल्यानंतर कर्ज भरलेल्या रकमेची संघात पावती द्यावी लागते. संघातून त्या पावतीवरून कर्जफेडीची नोंद केली जाते व त्या रकमेची पावती ही दिली जाते. कर्ज वाटपाप्रमाणे कर्ज वसुलीची पध्दत ही अप्रत्यक्ष स्वरूपाची असल्यामुळे कर्ज वसुली कमी प्रमाणात होते.

३) कर्जाची मर्यादा :

संघातून आठ उद्योगांना कर्ज पुरवठा केला जात असला तरी तो कर्ज वाटपाच्या आकृतीबंधानुसार दिला जात असल्यामुळे कमी आहे. १९८०-९१ या वर्षापासून कर्जाची मर्यादा मध्यवर्ती बँकेने काही उद्योगांची वाढविली व १९८९-९० या वर्षापासून नाबार्ड आकृतीबंधानुसार कर्ज वाटपाची मर्यादा

वाढविली गेली. या आकृतीबंधानुसार १९९१-९२ पासून कर्जवाटप झाले व त्याचा लाभ फारच कमी प्रमाणात कारागिरांना झाला आहे.

४) कर्ज मागणी अर्जाचे स्वरूप :

कारागिरांना बँकेच्या दारात पोहोचविण्याचे महत्वपूर्ण कार्य संघाकडून केले जात असले तरी कर्ज मागणी करताना कारागिरास व्यवसाय मुलाखत फॉर्म (अर्ज), हमीपत्र, उत्पन्नाचा दाखला, शिफारस, इत्यादींची पुर्तता करावी लागते. याशिवाय कर्ज मागणी अर्ज दोन प्रतीत अगर योग्य कर्जासाठी चार प्रतीत करावा लागतो. कर्ज मागणी या पुर्ततेमुळे कमी प्रमाणात कर्ज वाटप झाले आहे.

५) वाढती थकबाकी :

संघातून कर्ज वाटप कमी प्रमाणात होण्याचे हे प्रमुख कारण आहे. कर्ज वाटपाची रचना पाहिल्यास वास वेत व बांबू उद्योग व इतर उद्योगांना कर्ज वाटप कमी कमी होताना दिसून येत आहे. विशेष म्हणजे या उद्योगास १९९०-९१ च्या कर्जमाफी योजनेनंतर कर्ज वाटप झाले नाही. १९९०-९१ पर्यन्त उद्योगांची थकबाकी वाढताना दिसून येत आहे. त्यामुळे कर्जवाटप कमी प्रमाणात झाले आहे.

४.५ उद्योगाप्रमाणे कर्जवाटपाची वैशिष्ट्ये :

संघाने आठ उद्योगांना कर्ज पुरवठा केलेला असून १९७१-७३ ते १९९१-९२ या काळातील उद्योगाप्रमाणे कर्ज वाटपाचे विश्लेषण पुढील प्रमाणे केले आहे.

४.५.१ चर्मोद्योग व कर्ज वाटप :

१) वरील काळातील चर्मोद्योगातील कर्ज वाटपाची प्रत्येक वर्षाची रचना पाहिल्यास सर्वात जास्त कर्ज वाटप हे रु. २,३०,८९९ असून त्याचा लाभ २२८ सभासदांना झाला आहे. हे कर्ज वाटप १९८४-८५ या वर्षातील आहे.

चर्मोद्योगातील कमीतकमी कर्ज वाटप हे रु. ३,७०० असून त्याचा लाभ आठ सभासदांना झाला आहे. हे कर्ज वाटप १९७२-७३ या वर्षातील आहे.

२) या काळातील या उद्योगातील कर्ज वाटपातील प्रत्येक वर्षाची सभासद संख्या पाहिल्यास जास्तीतजास्त सभासद २६६ असून ते १९७६-७७ या वर्षातील आहेत मात्र त्यांना रु. १,२५,९३३ कर्ज पुरवठा झाला आहे. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या पाच असून ती १९९१-९२ या वर्षाची आहे तर त्यांना कर्ज वाटप रु. ६५,७६० इतके झाले आहे.

३) अभ्यास वर्षातील चर्मोद्योगातील एकूण कर्ज वाटप विचारात घेतल्यास सरासरी कर्ज वाटप रु. १,१९,११७ इतके आहे तर सरासरी सभासद संख्या १५१ इतकी आहे.

४.५.२ <u>कुंभार उद्योग व कर्ज वाटप</u> :

१) वरील काळातील या उद्योगातील जास्तीतजास्त कर्ज वाटप १९९१-९२ या वर्षी असून ते रु. ४,६२,५२० इतके आहे मात्र त्याचा लाभ फक्त १७ सभासदांना झाला आहे. या उद्योगातील कमीतकमी कर्ज वाटप रु. २,५०० असून त्याचा फक्त पाच सभासदांना लाभ झाला आहे. हे कर्ज वाटप १९७२-७३ या वर्षातील आहे.

२) वरील काळातील सभासद संख्या प्रत्येक वर्षाची पाहिल्यास जास्तीतजास्त सभासद १५१ असून त्यांना रु. ३,००,२२५ कर्ज वाटप झाले आहे. हो सभासद संख्या १९८४-८५ या वर्षातील आहे तर कमीतकमी सभासद संख्या १९७२-७३ या वर्षातली असून ती पाच इतकी आह व त्यांना रु. २,५०० कर्ज वाटप झाले आहे.

३) वरील काळातील कुंभार उद्योगातील एकूण कर्ज वाटप विचारात घेतल्यास सरासरी कर्ज वाटप रु. १,५२,३३६ असून सरासरी सभासद संख्या ७९ इतकी आहे.

४.५.३ सुतार-लोहार उद्योग व कर्ज वाटप :

१)अभ्यास काळातील या उद्योगातील कर्ज वाटप पाहिल्यास जास्तीत-जास्त कर्ज वाटप हे रु. १,११,८३६ असून त्याचा लाभ ७८ सभासदांना झाला आहे. हे कर्ज वाटप १९८७-८८ या वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी कर्ज वाटप रु. ३,५०० असून त्याचा लाभ सात सभासदांना मिळाला आहे. हे कर्ज वाटप १९७२-७३ या वर्षातील आहे.

२) वरील काळातील प्रत्येक वर्षातील सभासद विचारात घेतल्यास सर्वात जास्त सभासद संख्या ही १२६ असून त्यांना रु. ५१,१५४ कर्ज वाटप झाले आहे. ही सभासद संख्या १९७८-७९ या वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या फक्त दोन असून ती १९९०-९१ या वर्षातील आहे तर त्यांना रु. ५,३०० कर्ज पुरवठा झाला आहे.

३) वरील काळातील या उद्योगातील स्कुण कर्ज वाटप विचारात घेतल्यास सरासरी कर्ज वाटप रु. ५३,७२६ आहे तर सरासरी सभासद संख्या फक्त ६७ इतकी आहे.

४.५.४ वास उद्योग व कर्ज वाटप :

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगाच्या कर्ज वाटपाची आकडेवारी पाहिल्यास जास्तीतजास्त कर्ज वाटप हे रु. १,२३,४७२ असून त्याचा लाभ २७२ सभासदांना मिळाला आहे. हे कर्ज वाटप १९७५-७६ या वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी कर्ज वाटप रु. १६,८५० असून ते १९७२-७३ या वर्षातील आहे तर त्याचा लाभ ३८ सभासदांना झाला आहे.

२) वरील काळातील या उद्योगातील कर्ज वाटपाची सभासद संख्या पाहिल्यास जास्तीतजास्त सभासद ३१६ असून त्यांना कर्ज वाटप रु.९१,४२० झाले आहे. ही सभासद संख्या १९८२-८३ या वर्षातील असून या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या ही ३८ असून त्यांना रु. १६,८५० कर्ज वाटप झाले आहे. ही सभासद संख्या १९७२-७३ या वर्षातील आहे.

३) या कालखंडात या उद्योगाचे एकूण कर्ज वाटप पाहिल्यास सरासरी कर्ज वाटप रु. ८८,७५० आहे तर सरासरी सभासद संख्या २२८ इतकी आहे.

४) वास उद्योगाच्या कर्ज वाटपाची आकडेवारी पाहिल्यास या उद्योगास कर्ज वाटप १९८५-८६ नंतर कमी कमी होत गेले आहे व १९९०-९१ नंतर पूर्णपणे बंद आहे. कर्ज वाटप कमी होण्याचे कारण म्हणजे या उद्योगातील मांग समाजात कर्जफेडीची प्रवृत्ती कमी दिसून येते.

४.५.५ <u>वेत व बांबू उद्योग आणि कर्ज वाटप</u> :

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगातील कर्ज वाटपाची रचना पाहिल्यास जास्तीतजास्त कर्ज वाटप १९८६-८७ या वर्षातले असून ते रु. १८,४९७ आहे तर त्याचा लाभ ३४ सभासदांना झाला आहे. या उद्योगातील कमीतकमी कर्ज वाटप रु. २५० असून ते १९७२-७३ या वर्षातले आहे. हे कर्ज वाटप फक्त एक सभासदास झाले आहे.

२) या काळातील या उद्योगातील कर्ज वाटपातील सभासद संख्या पाहिल्यास सर्वात जास्त सभासद संख्या ६१ असून त्यांना कर्ज वाटप फक्त रु. १३,९१० झाले आहे. ही सभासद संख्या १९७५-७६ या वर्षातील आहे तर कमीतकमी सभासद संख्या एक असून ती १९७२-७३ या वर्षातील आहे तर त्यास रु. २५० कर्ज वाटप झाले आहे.

३) या काळातील या उद्योगातील एकूण कर्ज वाटप पाहिल्यास सरासरी कर्ज वाटप रु. १०,५१६ आहे तर सरासरी सभासद संख्या फक्त ३६ आहे.

४) वेत व बांबू उद्योगास इतर उद्योगांच्या तुलनेने कर्ज पुरवठा जास्त असला तरी तो चर्मोद्योग कुंभार उद्योग, सुतार-लोहार उद्योग व वास उद्योगाच्या तुलनेने कमी आहे. १९९०-९१ पासून या उद्योगास कर्ज पुरवठा झालेला नाही.


वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ, मर्यादित इस्लामपूर
कर्जवाटप व कर्जवसुली
सूचीः-
कर्जवाटप
कर्जवसुली
कर्जवाटप, कर्जवसुली '000' रुपयात
वर्ष

आलेख क्र.-१

४.५.६ इतर उद्योग व कर्ज वाटप :

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगाची कर्ज वाटपाची रचना पाहिल्यास जास्तीतजास्त कर्ज वाटप रु. ३,४९२ असून ते १९८१-८२ या वर्षातील आहे तर त्याचा लाभ फक्त आठ सभासदांना झाला आहे. या उद्योगातील कमीतकमी कर्ज वाटप रु. ५०० असून ते १९७३-७४ व १९७४-७५ या दोन वर्षातील आहे व त्याचा लाभ प्रत्येकी एका सभासदास झाला आहे.

२) वरील काळातील या उद्योगातील सभासद संख्या पाहिल्यास जास्तीतजास्त सभासद संख्या आठ असून ती १९८०-८१ ते १९८२-८३ या तीन वर्षात आहे. मात्र त्यांना कर्जपुरवठा वेगवेगळ्या प्रकारात झाला आहे. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या पाहिल्यास ती फक्त एक असून ती १९७३-७४ व १९७४-७५ या दोन वर्षातील आहे व त्यांना प्रत्येकी रु.५०० कर्ज वाटप झाले आहे.

३) या काळातील या उद्योगातील एकूण कर्ज वाटप विचारात घेतल्यास सरासरी कर्ज वाटप रु. २,३६२ तर सरासरी सभासद संख्या फक्त सहा इतकी आहे.

४) इतर उद्योगाच्या कर्ज वाटपाच्या आकडेवारीकडे पाहिल्यास या उद्योगास संघाकडून नगण्य स्वरूपाचे कर्ज वाटप केले आहे. १९९०-९१ पासून या उद्योगास कर्ज पुरवठा केलेला नाही.

४.६ कर्ज वसुली :

४.६.१ प्रस्तावना :

संघाच्या कर्ज वसुलीचा अभ्यास १९७२-७३ ते १९९१-९२ या २० वर्षांच्या काळातील असला तरी १९७२-७३ या वर्षी कर्ज वसुली झालेली नसल्यामुळे १९७३-७४ ते १९९१-९२ या काळातील कर्ज वसुलीचा विचार केलेला

आहे. १९७२-७३ हे संघाच्या कार्याचे (स्थापना वर्ष) पहिले वर्ष असल्यामुळे या वर्षी कर्ज वसुली होऊ शकत नाही. कर्ज वसुली चा अभ्यास करताना आठ उद्योगातून प्रत्येक वर्षीची कर्ज वसुली रक्कम व सभासद संख्या याचा आढावा घेतला आहे. तक्ता क्रमांक ४.२ मध्ये कर्ज वसुलीची सविस्तर चर्चा केली आहे. तक्ता क्रमांक ४.२ पुढीलप्रमाणे स्पष्ट केला आहे.

तक्ता क्रमांक ४.२

संघाने केलेली कर्ज वसुली व सभासद संख्या (१९७२-७३ ते १९९१-९२)

(आकडे रुपयात)

वर्ष	उद्योगाचा प्रकार						
	कर्मोद्योग	कुंभार उद्योग	सुतार-लोहार उद्योग	वाख उद्योग	वेत व बांबू उद्योग	इतर उद्योग	एकूण
१९७२-७३	-	-	-	-	-	-	-
१९७३-७४	१,२०५ (३)	२२० (१)	५४० (२)	३,५३५ (११)	१० (१)	-	५,५१० (१८)
१९७४-७५	२६,१२७ (५३)	१६,६०८ (१९)	१०,३७० (१५)	३५,२५२ (७०)	४,०६५ (२०)	४५८ (१)	९२,८८० (१७८)
१९७५-७६	३९,५९१ (८६)	११,५९५ (३०)	१०,५८६ (२५)	४५,९६० (१००)	६,९६० (३३)	६०७ (१)	१,१५,२९९ (२७५)
१९७६-७७	५३,९८५ (१३१)	२९,५९५ (४९)	१३,६८५ (२७)	२६,१३० (५९)	८,०८० (२५)	७०० (१)	१,३२,३७५ (२९२)
१९७७-७८	५९,८६५ (११०)	२१,६१० (४१)	१४,५१५ (४६)	२३,१३५ (६३)	३,१९० (१६)	६८० (२)	१,२२,९९५ (२७८)
१९७८-७९	५०,५७९ (९२)	३४,२५७ (४४)	१७,३८० (५१)	१५,८३५ (४०)	१,८५५ (१४)	-	१,१९,९०६ (२४१)
१९७९-८०	२३,४११ (६४)	४०,३४३ (५७)	११,७४० (२९)	६,८४४ (२५)	१,०२० (५)	-	८३,३५८ (१८०)
१९८०-८१	४६,४१० (८६)	३७,०४० (४३)	९,४२० (२६)	२,६३० (९)	३०० (२)	६३ (१)	९५,८६३ (१६८)
१९८१-८२	१३,८८० (२२)	२८,४६५ (२१)	५,४४६ (११)	१,४५० (६(	६०० (३)	३४२ (१)	५०,१८३ (६५)
१९८२-८३	९१,३१८ (१३८)	५३,८७६ (६०)	१४,३०० (२५)	२०,४१६ (१०१)	१,३७० (११)	९५ (१)	१,८१,३७५ (३३४)
१९८३-८४	३०,१९१ (७१)	५१,६४१ (३०)	१०,९८६ (१९)	२,२९९ (२१)	७९७ (४)		९५,९१४ (१४५)
१९८४-८५	१,३७,६६१ (१२१)	१,१४,००७ (८१)	२४,४७८ (३३)	१२,८७९ (१८)	९२४ (७)	-	२,८९,९४९ (२६०)
१९८५-८६	८८,८५० (८७)	७५,९३२ (४२)	२२,४८२ (२७)	१२,२५१ (२५)	१,४४२ (५)	-	२,००,९५७ (१८६)
१९८६-८७	६९,३०३ (५७)	१,०२,९०५ (४९)	३०,१८५ (२१)	८,४३५ (६)	४,५३२ (७)	-	२,१५,३६० (१४०)
१९८७-८८	९०,३३२ (७०)	४६,०५८ (२८)	२८,५९१ (२५)	२,६४२ (२५)	९८१ (६)	-	१,६८,६०४ (१५४)
१९८८-८९	५९,४०९ (५८)	३७,८६३ (१८)	२६,७३२ (२४)	४,१७२ (१४)	४,१३७ (११)	-	१,३२,३१३ (१२५)
१९८९-९०	३३,९५१ (२३)	३७,९४६ (१७)	२५,३८० (१७)	७५३ (२)	२,००० (४)	-	१,००,०३० (६३)
१९९०-९१	७९,१०० (२४)	३०० (१)	३,४०० (३)	-	-	-	८२,८०० (२८)
१९९१-९२	६९,००६ (३६)	२५,६३९ (१५)	४,८९९ (५)	-	-	-	९९,५४४ (५६)
एकूण :	१०,६४,१७४ (१३३२)	७,६५,९०० (६४६)	२,८५,११५ (४३१)	२,२४,६१८ (५९५)	४२,२६३ (१७४)	२,९४५ (८)	२३,८५,०१५ (३१८६)

(कंसातील आकडे सभासद संख्या दर्शवितात)

टीप : १९९०-९१ या वर्षात कर्ज माफी झालेली असल्यामुळे कर्जवसुली कमी प्रमाणात झाली आहे.

(आधार : कार्यालयीन कागदपत्रे)

४.६.२ तक्ता क्रमांक ४.२ ची वैशिष्टये पुढीलप्रमाणे विशद केली आहेत :

१) १९७३-७४ ते १९९१-९२ या काळातील संस्थातील कर्ज वसुलीची रचना पाहिल्यास जास्तीतजास्त कर्ज वसुली १९८४-८५ या वर्षातील असून ती रु. २,८९,९४९ रुपये आहे. ही कर्जवसुली २६० सभासदांकडून झाली आहे. याच काळातील कमीतकमी कर्ज वसुली रु. ५,५१० असून ती १८ सभासदांकडील आहे. ही कर्ज वसुली १९७३-७४ या वर्षातील आहे.

२) या काळातील कर्ज वसुलीच्या सभासदांची आकडेवारी पाहिल्यास सर्वात जास्त कर्ज वसुलीची सभासद संख्या ही ३३४ इतकी आहे व त्यांच्याकडून मात्र रु. १,८१,३७५ कर्ज वसुली झाली आहे. ही कर्ज वसुली सभासद संख्या १९८२-८३ या वर्षातील आहे.

३) वरील काळातील कर्ज वसुलीमध्ये सभासद संख्येत कमीतकमी सभासद संख्या ही १८ इतकी आहे तर त्यांच्याकडून रु. ५,५१० कर्ज वसुली झाली आहे. ही कर्ज वसुली सभासद संख्या १९७३-७४ या वर्षातील आहे.

४) या काळातील एकूण कर्ज वसुली विचारात घेतल्यास सरासरी कर्ज वसुली रु. १,२५,५२८ आहे. एकूण कर्ज वसुली व एकूण वर्षांची संख्या यांच्याशी ही सरासरी निगडीत आहे.

५) वरील कालखंडातील कर्ज वसुली एकूण सभासद संख्या पाहिल्यास सरासरी सभासद संख्या १६७ इतकी आहे. ही सरासरी एकूण सभासद व एकूण वर्षे यांच्याशी निगडीत आहे.

६) या काळातील उद्योगाप्रमाणे एकूण कर्ज वसुलीची रचना पाहिल्यास सर्वात जास्त कर्ज वसुली कांद्योगातून झाली असून ती रु. १०,६४,१७४ आहे. कांद्योगानंतर दुसरा क्रमांक कुंभार उद्योगाचा लागतो. या उद्योगातून रु. ७,६५,९०० कर्ज वसुली झाली आहे तर या काळातील उद्योगाप्रमाणे एकूण

कर्ज वसुली पाहिल्यास सुतार-लोहार उद्योगाचा तिसरा क्रमांक लागतो. या उद्योगातून रु. २,८५,११५ कर्ज वसुली झाली आहे. सुतार-लोहार उद्योगानंतर वास उद्योगाचा चौथा क्रमांक लागत असून या उद्योगातून एकूण कर्ज वसुली रु. २,२४,६१८ इतकी झाली आहे.

७) जर उद्योगाप्रमाणे एकूण कर्ज वसुली पाहिल्यास कर्ज वसुलीत पाचवा क्रमांक वेत व बांबू उद्योगाचा असून रु. ४२,२६३ कर्ज वसुली तर शेवटच्या क्रमांकावर इतर उद्योग असून फक्त रु. २,९४५ कर्ज वसुली झाली आहे व जर कर्ज वसुलीच्या एकूण सभासद संख्येची आकडेवारी पाहिल्यास क्रमानुसार चर्मोद्योग - १३३२, कुंभार उद्योग - ६४६, वास उद्योग - ५९५, सुतार-लोहार उद्योग - ४३१, वेत व बांबू - १७४ व इतर उद्योग फक्त आठ याप्रमाणे क्रम दिसून येतात.

८) येथे एकूण कर्ज वसुली रु. २३,८५,०१५ झाली असून तो एकूण ३,१८६ इतक्या सभासदांकडून झालेली आहे. तसेच प्रत्येक वर्षातील सरासरी कर्ज वसुली पाहिल्यास जास्तीत जास्त सरासरी कर्ज वसुली रु. २,९५८ असून ती १९९०-९१ या वर्षातील आहे तर कमीतकमी सरासरी कर्ज वसुली रु. ३०७ असून ती १९७३-७४ या वर्षातील आहे. कर्ज वसुलीची ही सरासरी त्या त्या वर्षांची सभासद संख्या व त्या त्या वर्षांची कर्ज वसुली यांच्याशी निगडीत आहे.

९) एकूण कर्ज वसुली रु. २३,८५,०१५ असून एकूण येणे बाकी रु. ५७,६८,४४७ आहे. येणे बाकीचे कर्ज वसुलीशी प्रमाण पाहिल्यास ते ४१.३४ टक्के इतके येते.

१०) १९७३-७४ ते १९९१-९२ या काळातील एकूण कर्ज वसुलीची तुलना पाहिल्यास कर्ज वसुलीची उद्योगाप्रमाणे टक्केवारी पुढीलप्रमाणे येते :

अनु.	उद्योग	एकूण कर्ज वसुली	टक्केवारी
१.	चर्मोद्योग	१०,६४,१७४	४४.६१
२.	कुंभार-उद्योग	७,६५,९००	३२.११
३.	सुतार-लोहार उद्योग	२,८५,११५	११.९५
४.	वाख उद्योग	२,२४,६१८	९.४१
५.	वेत व बांबू उद्योग	४२,२६३	१.७७
६.	इतर उद्योग	२,९४५	०.१२
	एकूण :	२३,८५,०१५	९९.९७

वरील कोष्टकात चर्मोद्योग व कुंभार उद्योगांची कर्ज वसुलीची टक्केवारी ही ७६.७२ टक्के इतकी असून ती एकूण टक्केवारीच्या $\frac{३}{४}$ इतकी आहे. याचा अर्थ इतर सर्व उद्योगांच्या एकत्रित कर्ज वसुलीच्या टक्केवारीपेक्षा या दोन उद्योगातून जास्त कर्ज वसुली झाली आहे.

११) १९७३-७४ ते १९९१-९२ या काळातील एकूण सभासदांची टक्केवारी पाहिल्यास ती पुढीलप्रमाणे दिसून येते.

अनु.	उद्योग	एकूण सभासद	टक्केवारी
१)	चर्मोद्योग	१३३२	४१.४९
२)	कुंभार उद्योग	६४६	२०.२७
३)	सुतार-लोहार उद्योग	४३१	१३.५२
४)	वाख उद्योग	५९५	१८.६७
५)	वेत व बांबू उद्योग	१७४	५.४६
६)	इतर उद्योग	८	०.२५
	एकूण :	३१८६	९९.६६

वरील कोष्टकात चर्मोद्योगातील सभासद संख्येची टक्केवारी ही कुंभार व सुतार-लोहार उद्योगातील सभासद संख्येच्या टक्केवारीपेक्षा जास्त आहे. याचा अर्थ चर्मोद्योगातील कर्ज वसुली सर्वात जास्त आहे.

४.६.३ उद्योगाप्रमाणे कर्जवसुलीची वैशिष्ट्ये :

१९७३-७४ ते १९९१-९२ या काळातील उद्योगाप्रमाणे झालेल्या कर्ज वसुलीची वैशिष्ट्ये पुढीलप्रमाणे विशद केली आहेत.

अ) चर्मोद्योग व कर्ज वसुली -

१) १९७३-७४ या काळातील चर्मोद्योगातील कर्ज वसुलीची रचना पाहिल्यास जास्तीतजास्त कर्ज वसुली रु. १,३७,६६१ असून ती १२१ सभासदांकडून झाली आहे. ही कर्ज वसुली १९८४-८५ या वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी कर्ज वसुली रु. १,२०५ असून ती फक्त तीन सभासदांची आहे. ही कर्ज वसुली १९७३-७४ या वर्षातील आहे.

२) वरील काळातील कर्ज वसुलीतील सभासद संख्या पाहिल्यास सर्वात जास्त सभासद १३८ असून त्यांच्याकडून रु. ९१,३१८ कर्ज वसुली झाली आहे. ही कर्ज वसुली सभासद संख्या १९८२-८३ या वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या तीन असून त्यांच्याकडून रु. १,२०५ कर्ज वसुली झाली आहे. ही कर्ज वसुली १९७३-७४ वर्षातील आहे.

३) या काळातील चर्मोद्योगातील एकूण कर्ज वसुली पाहिल्यास सरासरी कर्ज वसुली पाहिल्यास सरासरी कर्ज वसुली रु. ५६,०१० आहे तर सरासरी सभासद संख्या ७१ इतकी आहे.

ब) कुंभार उद्योग व कर्ज वसुली -

१) १९७३-७४ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगाच्या कर्ज वसुलीची आकडेवारी पाहिल्यास जास्तीतजास्त कर्ज वसुली रु. १,१४,००७ असून ती ८१ सभासदांकडील आहे. ही कर्ज वसुली १९८४-८५ या वर्षातील

आहे. या उद्योगातील कमीतकमी कर्ज वसुली रु. २२० असून ती १९७३-७४ या वर्षातील एक सभासदाची आहे.

२) अभ्यास वर्षातील या उद्योगातील सभासद संख्या विचारात घेतल्यास जास्तीतजास्त सभासद संख्या ८१ असून त्यांच्याकडून रु. १,१४,००७ कर्ज वसुली झाली आहे. ही सभासद संख्या १९८४-८५ या वर्षातील आहे तर कमीतकमी कर्ज वसुली सभासद संख्या एक असून ती १९७३-७४ व १९९०-९१ या दोन वर्षी आहे तर त्यांच्याकडून अनुक्रमे रु. २२० व रु. ३०० कर्ज वसुली झाली आहे.

३) वरील काळातील या उद्योगातील एकूण कर्ज वसुली विचारात घेतल्यास सरासरी कर्ज वसुली रु. ४०,३११ आहे तर सरासरी सभासद संख्या ३४ इतकी आहे.

क) <u>सुतार-लोहार उद्योग व कर्ज वसुली</u> -

१) १९७३-७४ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगातील कर्ज वसुलीच्या आकडेवारीची रचना पाहिल्यास जास्तीत जास्त कर्ज वसुली रु. ३०,१८५ असून ती २१ सभासदांची आहे. ही कर्ज वसुली १९८६-८७ या वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी कर्ज वसुली रु. ५४० असून ती दोन सभासदांची आहे. ही कर्ज वसुली १९७३-७४ या वर्षातील आहे.

२) या काळातील सभासद संख्येची आकडेवारी पाहिल्यास जास्तीत-जास्त सभासद १९७८-७९ या वर्षात असून ती ५१ आहे तर त्यांच्याकडून रु. १७,३८० कर्ज वसुली झाली आहे. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या दोन असून त्यांच्याकडून रु. ५४० कर्ज वसुली झाली आहे. ही सभासद संख्या १९७३-७४ या वर्षातील आहे.

३) जर या उद्योगातील एकूण कर्ज वसुली विचारात घेतल्यास सरासरी कर्ज वसुली रु. १५,००७ तर सरासरी सभासद संख्या २३ इतकी आहे.

ड) वाख उद्योग व कर्ज वसुली -

१) १९७३-७४ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगातील कर्ज वसुलीची रचना पाहिल्यास जास्तीतजास्त कर्ज वसुली रु. ४५,९६० असून ती १०० सभासदांची आहे. ही कर्ज वसुली १९७५-७६ वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी कर्जवसुली ही १९८९-९० या वर्षी असून ती रु. ७५३ आहे. ही कर्ज वसुली दोन सभासदांची आहे.

२) जर या उद्योगातील सभासदांची रचना पाहिल्यास जास्तीतजास्त सभासद संख्या १०१ असून त्यांच्याकडून रु. २०,४१६ कर्ज वसुली झाली आहे. ही कर्ज वसुली सभासद संख्या १९८२-८३ या वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या दोन असून ती १९८९-९० या वर्षात असून त्यांचेकडून रु. ७५३ कर्ज वसुली झाली आहे.

३) येथे एकूण कर्ज वसुली विचारात घेतल्यास सरासरी कर्जवसुली रु. १३,२१३ तर सरासरी सभासद संख्या ३५ इतकी आहे. १९९०-९१ पासून कर्ज वसुली या उद्योगात झालेली नाही.

इ) वेत व बांब उद्योग व कर्ज वसुली -

१) १९७३-७४ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगातील कर्ज वसुलीची रचना पाहिली तर जास्तीतजास्त कर्ज वसुली १९७६-७७ या वर्षी असून ती रु. ८,०८० ती २५ सभासदांकडील आहे तर कमीतकमी कर्जवसुली रु.१० १९७३-७४ या वर्षात असून ती एका सभासदाकडील आहे.

२) वरील काळातील सभासद संख्या पाहिल्यास जास्तीतजास्त सभासद ३३ असून ही सभासद संख्या १९७५-७६ या वर्षातील आहे. तर त्यांचेकडून रु. ६,९६० कर्ज वसुली झाली आहे. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या एक असून ती १९७३-७४ या वर्षातील आहे.

३) एकूण कर्ज वसुली पाहिल्यास सरासरी कर्ज वसुली रु. २,४८७ असून सरासरी सभासद संख्या ११ इतकी आहे. १९९०-९१ पासून या उद्योगातून कर्ज वसुली झालेली नाही.

फ) इतर उद्योग व कर्ज वसुली -

१) १९७३-७४ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगाची कर्ज वसुली पाहिली तर जास्तीतजास्त कर्ज वसुली रु. ७०० असून ती १९७६-७७ या वर्षातील आहे तर कमीतकमी कर्ज वसुली रु. ६३ असून ती १९८०-८१ या वर्षातील आहे.

२) सभासद संख्या पाहिल्यास जास्तीत जास्त सभासद दोन असून ते १९७७-७८ या वर्षातील आहेत तर कमीत कमी सभासद संख्या एक असून ती अनेक वर्षात दिसून येते.

३) जर एकूण कर्ज वसुली पाहिल्यास सरासरी कर्ज वसुली रु. ४२१ तर सरासरी सभासद संख्या दोन इतकी आहे.

४) इतर उद्योगातील कर्ज वसुलीची रचना पाहिल्यास ती संमिश्र स्वरूपाची आहे. याशिवाय १९८३-८४ या वर्षापासून कर्ज वसुली पूर्ण बंद आहे.

४.७ येणे बाकी :

४.७.१ प्रस्तावना :

संघाच्या येणेबाकीचा अभ्यास हा १९७२-७३ ते १९९१-९२ या २० वर्षांच्या काळातील आहे. संघातील सभासदांच्या येणे बाकीचा अभ्यास करताना प्रत्येक वर्षाची येणे बाकी, प्रत्येक वर्षाची सभासद संख्या उद्योगाप्रमाणे स्पष्ट केली आहे. वरील सर्व माहिती तक्ता क्रमांक ४.३ मध्ये स्पष्ट केली आहे. तक्ता क्रमांक ४.३ पुढीलप्रमाणे आहे.

तक्ता क्रमांक ४.३

संघातील कर्जदार सभासदांकडील येणे बाकी व सभासद संख्या (१९७२-७३ ते १९९१-९२)

(आकडे रुपयात)

वर्ष	उद्योगाचा प्रकार						
	कोष्टी उद्योग	कुंभार उद्योग	सुतार-लोहार उद्योग	बारा उद्योग	वेत व बांबू उद्योग	इतर उद्योग	एकूण
१९७२-७३	३,७०० (८)	२,५०० (५)	३,५०० (७)	१६,८५० (३८)	२५० (१)	-	२६,८०० (५९)
१९७३-७४	३०,१३५ (६१)	१०,२८५ (२०)	१२,२५० (२५)	८२,९०७ (१८०)	५,९९० (२४)	५०० (१)	१,४२,०६७ (३११)
१९७४-७५	३०,२२९ (६०)	१०,७७० (२३)	१४,२७५ (३०)	७६,३७५ (१७०)	५,४८५ (२४)	४२ (१)	१,३७,१७६ (३०८)
१९७५-७६	६५,९३३ (११८)	२३,६५५ (४१)	२२,२१४ (४७)	७७,५१२ (१७२)	६,९५० (२८)	१,७०० (३)	१,९७,९६४ (४०९)
१९७६-७७	७१,९४८ (१३५)	३२,३६० (५७)	२९,८६० (६४)	८५,९४३ (२१४)	६,९५० (२८)	१,९०० (३)	२,२८,९६१ (५०१)
१९७७-७८	७८,५७८ (१४७)	३०,७३५ (५३)	३४,५८४ (७६)	८५,५५७ (२१४)	७,८५० (३२)	२,२२० (५)	२,३९,५२४ (५२७)
१९७८-७९	७५,१८९ (१४१)	४९,९०८ (६७)	३३,७७४ (७५)	८६,२५५ (२१८)	७,०९५ (३१)	३,२२० (७)	२,५५,४४१ (५३९)
१९७९-८०	७२,३३८ (१३७)	४६,७२२ (६३)	३०,९७९ (६९)	८४,५४९ (२१७)	७,२२५ (३१)	३,२२० (७)	२,४५,०३३ (५२४)
१९८०-८१	३६,२६८ (७७)	४२,०५२ (६०)	२५,८८४ (५३)	८३,३९७ (२११)	७,३७५ (३२)	३,१५० (७)	१,९८,१२६ (४४०)
१९८१-८२	४२,४४३ (७३)	५२,२१७ (५६)	२६,६१४ (५३)	८३,२८२ (२१२)	६,७७५ (२९)	२,६१० (७)	२,१३,९४१ (४३०)
१९८२-८३	४६,६८८ (८०)	८७,६२६ (५६)	२८,८४९ (५२)	७१,००४ (२१५)	६,२९५ (२९)	२,५५५ (७)	२,४३,०१७ (४३९)
१९८३-८४	६६,०३३ (९३)	७४,७८० (५३)	३७,५३६ (५२)	७३,२४५ (२१२)	६,५१० (३०)	२,६०० (७)	२,६०,७०४ (४४७)
१९८४-८५	९३,२३८ (१०७)	१,८६,२१८ (७०)	७०,९३५ (६३)	७१,८९२ (२०६)	८,१७९ (२९)	२,६०० (७)	४,३३,०६२ (४८२)
१९८५-८६	१,३८,१३० (१०९)	२,४३,९०९ (७५)	७१,०३९ (५४)	८०,३३९ (२१२)	१७,०२३ (३१)	१,६६७ (४)	५,५२,१०७ (४८५)
१९८६-८७	३८,०५८ (१०४)	२,१९,४९८ (६३)	७१,१६६ (५२)	८२,६६२ (२१८)	१३,९६५ (२७)	२,१६७ (५)	४,२७,५१६ (४६९)
१९८७-८८	१,३५,९८५ (१०४)	१,८४,६६२ (५९)	८३,२४५ (५३)	८१,७१२ (२१२)	१३,८४० (२६)	२,१६७ (५)	५,०१,६११ (४५९)
१९८८-८९	१,२४,४३७ (९०)	१,४५,०५४ (५२)	६६,२७३ (४८)	७५,७७९ (१९६)	१०,१४० (२३)	२,१६७ (५)	४,२३,८५० (४१४)
१९८९-९०	१,०३,०२१ (८५)	१,२४,४४० (४७)	५१,२२८ (४६)	७३,६५८ (१९२)	८,५१८ (१९)	२,१६७ (५)	३,६३,०३२ (३९४)
१९९०-९१	२०,७०० (११)	१०,९०० (७)	१२,०९७ (५)	१,८८६ (८)	-	-	४५,५८३ (२३)
१९९१-९२	७४,५६० (१२)	४,६९,९७३ (२२)	८६,५९७ (१०)	१,८०२ (७)	-	-	६,३२,९३२ (५१)
एकूण :	१३,४७,६११ (१७५२)	२०,४८,२६४ (९४९)	८,१२,८९९ (९३४)	१३,७६,६०६ (३५२४)	१,४६,४१५ (४७४)	३६,६५२ (८६)	५७,६८,४४७ (७७१९)

(कंसातील आकडे सभासद संख्या दर्शवितात)

आधार : कार्यालयीन कागदपत्रे.

४.७.२ तक्त्याची वैशिष्टये :

तक्ता क्रमांक ४.३ ची वैशिष्टये पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहेत :

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील प्रत्येक वर्षातील एकूण येणे बाकीची रचना पाहिली तर जास्तीतजास्त येणे बाकी १९९१-९२ या वर्षातील असून ती रु. ६,३२,९३२ आहे. ही येणे बाकी ५१ सभासदांकडील आहे व वरील काळातील सर्वात कमी येणे बाकी १९७२-७३ या वर्षातील असून ती रु. २६,८०० आहे. ही येणे बाकी ५९ सभासदांतील आहे.

२) येथे सभासद संख्या विचारात घेतल्यास जास्तीतजास्त सभासद ५३९ असून त्यांचेकडे येणे बाकी रु. २,५५,४४१ आहे. ही सभासद संख्या १९७८-७९ या वर्षातील आहे. तसेच या काळातील, कमीतकमी सभासद संख्या २३ इतकी असून त्यांची येणे बाकी रु. ४५,५८३ आहे. ही सभासद संख्या १९९०-९१ या वर्षातील आहे.

३) एकूण येणे बाकी विचारात घेतल्यास सरासरी येणे बाकी रु. २,८८,४२२ आहे. एकूण येणे बाकी व एकूण वर्षे यांच्याशी ही सरासरी निगडीत आहे.

४) जर एकूण सभासद संख्या पाहिल्यास सरासरी सभासद संख्या ३८६ इतकी आहे. ही सरासरी एकूण सभासद व एकूण वर्षे यांच्याशी निगडित आहे तर या काळातील सभासदांची एकूण येणे बाकी रक्कम रु. ५७,६८,४४७ आहे तर एकूण सभासद संख्या ७,७११ इतकी आहे.

५) येथे उद्योगाप्रमाणे येणे बाकीची रचना पाहिल्यास कुंभार उद्योगाची येणे बाकी सर्वात जास्त असून ती रु. २०,४८,२६४ आहे. तर त्या पाठोपाठ वाल उद्योगाचा दुसरा क्रमांक असून या उद्योगातील येणे बाकी रु. १३,७६,६०६ आहे. तर येणे बाकीत कर्मयोग तिसरा क्रमांक असून रु.१३,४७,६११ येणे बाकी आहे तर चौथ्या क्रमांकावर सुतार-लोहार उद्योग असून रु. ८,१२,८९९ इतकी येणे बाकी आहे.

६) या काळातील येणे बाकीत वेत व बांबू उद्योग पाचव्या क्रमांकावर आहे. या उद्योगातील येणे बाकी रु. १,४६,४१५ आहे तर त्यानंतर इतर उद्योग असून येणे बाकी रु. ३६,६५२ आहे व उद्योगाप्रमाणे सभासद संख्या पाहिल्यास क्रमानुसार वाख उद्योग - ३,५२४, चर्मोद्योग - १,७५२, कुंभार उद्योग - ९४९, सुतार-लोहार उद्योग - ९३४, वेत व बांबू उद्योग - ४७४ तर इतर उद्योगाची सभासद संख्या ८६ इतकी आहे.

७) अभ्यास कालखंडातील प्रत्येक वर्षातील सरासरी येणे बाकी पाहिल्यास जास्तीत जास्त सरासरी येणे बाकी रक्कम ही १९९१-९२ या वर्षातील असून ती रु. १२,४११ रुपये आहे तर कमीतकमी सरासरी येणे बाकी १९७४-७५ या वर्षातील असून ती रु. ४४६ आहे. येणेबाकीची ही सरासरी त्या त्या वर्षांची सभासद संख्या व त्या त्या वर्षातील येणे बाकी यांच्याशी निगडित आहे.

८) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील येणे बाकीची उद्योगाप्रमाणे टक्केवारी पाहिल्यास ती पुढीलप्रमाणे दिसून येते :

अनु.	उद्योग	एकूण येणे बाकी	टक्केवारी
१)	चर्मोद्योग	१३,४७,६११	२३.३६
२)	कुंभार उद्योग	२०,४८,२६४	३५.५०
३)	सुतार-लोहार उद्योग	८,१२,८९९	१४.०९
४)	वाख उद्योग	१३,७६,६०६	२३.८६
५)	वेत व बांबू उद्योग	१,४६,४१५	२.५३
६)	इतर उद्योग	३६,६५२	०.६३
	एकूण :	५७,६८,४४७	९९.९७

वरील कोष्टकात येणेबाकीची उद्योगाप्रमाणे टक्केवारी पाहिल्यास कुंभार व चर्मोद्योग यांची एकत्रित येणेबाकीची टक्केवारी ५९.१३ इतकी आहे. याचा अर्थ या दोन उद्योगातील येणेबाकी इतर सर्व उद्योगांच्या एकत्रित येणेबाकीपेक्षा जास्त आहे.

९) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील उद्योगाप्रमाणे सभासदांची टक्केवारी पुढीलप्रमाणे स्पष्ट केली आहे.

अनु.	उद्योग	एकूण सभासद	टक्केवारी
१.	कर्मोद्योग	१७५२	२२.६९
२.	कुंभार उद्योग	९४९	१२.२९
३.	सुतार-लोहार उद्योग	९३४	१२.१०
४.	वाख उद्योग	३५२४	४५.६५
५.	वेत व बांबू उद्योग	४७४	६.१४
६.	इतर उद्योग	८६	१.११
	एकूण :	७७१९	९९.९८

वरील कोष्टकातील सभासदांची टक्केवारी पाहिल्यास वाख उद्योगाची टक्केवारी ४५.६५ इतकी आहे म्हणजे हे प्रमाण जवळजवळ निम्मे आहे म्हणजे इतर सर्व उद्योगांची टक्केवारी ५४.३३ इतकी आहे.

४.७.३ <u>उद्योगाप्रमाणे येणे बाकीची वैशिष्ट्ये</u> :

अ) <u>कर्मोद्योग व येणे बाकी</u> -

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील कर्मोद्योगातील येणे बाकीची रचना पाहिल्यास जास्तीतजास्त रु. १,३८,१३० असून ती १०९ सभासदांची आहे. ही येणे बाकी १९८५-८६ या वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी येणे बाकी १९७२-७३ या वर्षातील असून ती रु. ३,७०० आठ सभासदांची आहे.

२) वरील काळातील येणे बाकी सभासद संख्या पाहिल्यास सर्वात जास्त सभासद संख्या १४७ इतकी असून त्यांची येणे बाकी रु. ७८,५७८ आहे. ही येणे बाकी १९७७-७८ वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या आठ असून ती १९७२-७३ या वर्षातील आहे. तर त्यांची येणे बाकी रु. ३,७०० आहे.

३) या काळातील एकूण येणे बाकी पाहिल्यास सरासरी येणे बाकी रु. ६७,३८० तर सरासरी सभासद संख्या ही ८८ इतकी आहे.

ब) कुंभार उद्योग व येणे बाकी -

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगाच्या येणे बाकीच्या आकडेवारीची रचना पाहिली तर जास्तीतजास्त येणे बाकी १९९१-९२ या वर्षातील असून ती रु. ४,६९,९७३ आहे. ही येणे बाकी फक्त २२ सभासदांकडील आहे. या उद्योगातील कमीतकमी येणे बाकी रु. २,५०० असून ती पाच सभासदांकडील १९७२-७३ या वर्षातील आहे.

२) या काळातील येणे बाकीच्या सभासदांची रचना पाहिली तर जास्तीतजास्त सभासद ७५ असून येणे बाकी रु. २,४३,९०९ आहे. ही सभासद संख्या १९८५-८६ या वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या पाच असून त्यांची येणे बाकी रु. २,५०० आहे. ही सभासद संख्या १९७२-७३ या वर्षातील आहे.

३) या काळातील एकूण येणे बाकी पाहिल्यास सरासरी येणे बाकी रु. १,०२,४१३ आहे तर सरासरी सभासद संख्या ४८ इतकी आहे.

क) सुतार-लोहार उद्योग व येणे बाकी -

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगाच्या येणे बाकीची रचना पाहिली तर जास्तीत जास्त येणे बाकी १९९१-९२ या वर्षातील असून ती रु. ८६,५९७ १० ही १० सभासदांची आहे. तर कमीतकमी येणे बाकी १९७२-७३ या वर्षातील असून ती रु. ३,५०० ही सात सभासदांच्या-कडील आहे.

२) वरील काळातील सभासद संख्या पाहिल्यास जास्तीतजास्त सभासद ७६ असून त्यांची येणे बाकी रु. ३४,५२४ आहे. ही सभासद संख्या १९७७-७८ या वर्षातील आहे. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या पाच असून त्यांची येणे बाकी रु. १२,०९७ आहे. ही सभासद संख्या १९९०-९१ या वर्षातील आहे.

३) या काळातील एकूण येणे बाकी पाहिल्यास सरासरी येणे बाकी रु. ४०,६४५ आहे तर सरासरी सभासद संख्या ४७ इतकी आहे.

ड) वाख उद्योग व येणे बाकी -

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील वाख उद्योगाच्या येणे बाकीची रचनापाहिल्यास सर्वात जास्त येणे बाकी १९७८-७९ या वर्षातील असून ती रु. ८६,२५५ ही २१४ सभासदांची आहे तर कमीतकमी येणे बाकी १९९१-९२ या वर्षातील असून ती रु. १,८०२ ही सात सभासदांकडील आहे.

२) या काळातील येणे बाकी सभासद संख्या पाहिल्यास सर्वात जास्त सभासद १९७८-७९ व १९८६-८७ या दोन वर्षातील असून त्यांची येणे बाकी अनुक्रमे रु. ८६,२५५ व रु. ८२,६६२ आहे तर कमीतकमी सभासद संख्या १९९१-९२ या वर्षातील असून ती सात इतकी आहे, तर त्यांची येणे बाकी रु. १,८०२ आहे.

३) या काळातील एकूण येणे बाकी पाहिल्यास सरासरी येणे बाकी रु. ६८,८३० तर सरासरी सभासद संख्या १७६ इतकी आहे.

इ) वेत व बांबू उद्योग व येणे बाकी -

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगाच्या येणे बाकीची रचना पाहिल्यास सर्वात जास्त येणे बाकी १९८५-८६ या वर्षातील असून ती रु. १७,०२३ ही ३१ सभासदांची आहे तर कमीतकमी येणे बाकी १९७२-७३ या वर्षातील असून ती रु. २५० ही एका सभासदाकडील आहे.

२) याच काळातील सभासद संख्या पाहिल्यास सर्वात जास्त सभासद ३२ असून ही सभासद संख्या १९७७-७८ व १९८०-८१ या वर्षातील आहे तर त्यांची येणे बाकी अनुक्रमे रु. ७,८५० व रु. ७,३७५ आहे.

३) याच काळातील एकूण येणे बाकी पाहिल्यास सरासरी येणे बाकी रु. ८,१३४ तर सरासरी सभासद संख्या २६ इतकी आहे. १९९०-९१ पासून या उद्योगाकडे कर्जमाफी योजनेमुळे येणे बाकी दिसून येत नाही.

फ) <u>इतर उद्योग व येणे बाकी</u> -

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगाची येणे बाकी पाहिल्यास सर्वात जास्त येणे बाकी १९७७-७८ व १९७८-७९ या वर्षी असून ती रु. ३,२२० आहे. ही येणे बाकी दोन्ही वर्षात सात सभासदांची आहे. या उद्योगातील कमीतकमी येणे बाकी रु. ४२ असून ती एका सभासदाकडील १९७४-७५ या वर्षातील आहे.

२) या काळातील सभासद संख्या विचारात घेतल्यास सर्वात जास्त सभासद सात असून ते १९७८-७९ ते १९८४-८५ या काळातील प्रत्येक वर्षातील आहे. तर त्यांची येणे बाकी वेगवेगळी दिसून येते. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या १९७३-७४ व १९७४-७५ या वर्षातील असून ती एक आहे तर त्यांची येणे बाकी अनुक्रमे रु. ५०० व रु. ४२ आहे.

३) याच काळातील एकूण येणे बाकी पाहिल्यास सरासरी येणे बाकी रु. २,१५६ आहे तर सरासरी सभासद संख्या फक्त पाच इतकी आहे तर १९९०-९१ पासून या उद्योगाकडे येणे बाकी दिसून येत नाही कारण या वर्षात संघातील सभासदांना कर्ज माफी योजनेचा लाभ झाला आहे.


वाळवा तालुका कारागिर विकास ग्रामोद्योग संघ, मर्यादित इस्लामपूर
येणेबाकी व थकबाकी
सूची-
येणेबाकी
थकबाकी
येणेबाकी-थकबाकी '000' रुपयात
वर्ष

आलेख क्र.-2

४.८ थकबाकी :

४.८.१ प्रस्तावना :

संघातील कर्जदार सभासदांच्या थकबाकीचा अभ्यास १९७४-७५ ते १९९१-९२ या १८ वर्षांच्या काळातील आहे. थकबाकी उद्योगाप्रमाणे स्पष्ट केली असून त्या त्या वर्षांची थकबाकी व सभासद संख्या स्पष्ट केलेली आहे. थकबाकीचा हा अभ्यास तक्ता क्रमांक ४.४ च्या साहाय्याने केला असून तो तक्ता पुढील प्रमाणे दिला आहे.

कोष्टक ४.४

जिल्हातील कारागीर लाभार्थींकडील थकबाकी व लाभार्थ संख्या (१९७२-७३ ते १९९१-९२)

(आकडे लाखात)

वर्ष	उद्योगाचा प्रकार						
	कापडी	कुंभार उद्योग	सुतार-लोहार उद्योग	बारा उद्योग	वेत व बांबू उद्योग	इतर उद्योग	एकूण
१९७२-७३	-	-	-	-	-	-	-
१९७३-७४	-	-	-	-	-	-	-
१९७४-७५	६,०५० (१३)	१,२०० (३)	१,२५० (५)	१७,५०० (३३)	९५० (५)	-	२६,९५० (५९)
१९७५-७६	८,२५० (२०)	३,५०० (५)	३,२५० (९)	१८,५०० (४०)	१,०५० (६)	५०० (१)	३५,०५० (८२)
१९७६-७७	१०,२५० (२५)	६,५५० (१६)	४,५६० (१३)	२१,५५० (६७)	१,०५० (६)	५०० (१)	४४,४६० (१११)
१९७७-७८	१५,३५० (३०)	६,४५० (१४)	७,५०० (१५)	२५,६५० (७७)	१,५०० (९)	५०० (१)	५६,९५० (१३९)
१९७८-७९	१५,३५० (३०)	९,५०० (१६)	८,५०० (१९)	२७,५५० (७६)	१,५०० (९)	९५० (२)	६३,३५० (१५२)
१९७९-८०	१७,५०० (३५)	९,५०० (१६)	१६,५०० (२३)	३३,५०० (९५)	२,००० (१०)	१,५५० (५)	७५,५५० (१८४)
१९८०-८१	११,४५० (२५)	९,५०० (१६)	१०,२५० (२०)	३४,५०० (९७)	२,५०० (११)	३,१५० (७)	७९,३५० (१७६)
१९८१-८२	१६,५०० (२५)	१३,५५० (१७)	१६,५०० (२२)	३४,५०० (१०५)	२,५५० (११)	२,६१० (७)	७६,२१० (१८७)
१९८२-८३	१०,५०० (२१)	१४,५०० (१६)	१६,५०० (२२)	३७,५०० (११५)	२,५०० (१०)	२,५५५ (७)	७९,०५५ (१९४)
१९८३-८४	१५,६०० (२७)	१६,३५० (२३)	१४,५०० (२५)	३९,३५० (१२०)	२,५०० (१०)	२,६०० (७)	९०,९०० (२१२)
१९८४-८५	२०,५०० (३३)	२३,५०० (२४)	२३,२०० (२७)	४२,४३० (१२५)	२,९५० (१५)	२,६०० (७)	१,१५,१८० (२३१)
१९८५-८६	४७,५०० (५५)	९५,३०० (२७)	३९,४५० (३४)	६१,३०० (१७०)	६,३०० (२०)	१,६६७ (४)	२,५१,५१७ (३१०)
१९८६-८७	५४,५५० (६०)	१,०५,६०० (३६)	४१,२०० (३७)	६४,५५० (१७३)	७,३०० (२३)	२,१६७ (५)	२,७५,३६७ (३३४)
१९८७-८८	६७,५०० (७०)	१,३०,००० (३९)	४३,५०० (४०)	६४,५०० (१७३)	७,३०० (२३)	२,१६७ (५)	३,१४,९६७ (३५०)
१९८८-८९	७२,५५० (७२)	१,३०,५५० (४९)	४२,५०० (३९)	६४,५०० (१७३)	६,५०० (१५)	२,१६७ (५)	३,१७,७६७ (३५३)
१९८९-९०	-	३,५०० (४)	-	-	-	-	३,५०० (४)
१९९०-९१	२,९०० (२)	-	६,००० (२)	-	-	-	८,९०० (४)
१९९१-९२	२,००० (१)	-	९,००० (३)	-	-	-	११,००० (४)
एकूण :	३,८८,३०० (५४४)	५,७९,०५० (३२२)	२,८९,१६० (३५५)	५,८७,३८० (१६२५)	४८,४५० (१८३)	२५,६८३ (६४)	१९,१८,७२३ (३०९३)

(कंसातील आकडे लाभार्थ संख्या दर्शवितात)

आधार : कार्यालयीन कागदपत्रे

४.८.२ तक्त्याची वैशिष्ट्ये :

१) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील संघातील प्रत्येक वर्षातील थकबाकीची आकडेवारी पाहिल्यास सर्वात थकबाकी १९८८-८९ या वर्षातील असून ती रु. ३,१७,७६७ इतकी आहे. ही थकबाकी ३५३ सभासदांची आहे तर वरील काळातील थकबाकी पाहिल्यास कमीतकमी थकबाकी १९८९-९० या वर्षातील असून ती रु. ३,५०० ही चार सभासदांकडील आहे.

२) याच काळातील सभासद संख्या विचारात घेतल्यास सर्वात जास्त सभासद संख्या ३५३ असून त्यांच्याकडील थकबाकी रु. ३,१४,९६७ आहे. ही सभासद संख्या १९८७-८८ या वर्षातील आहे तर १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील कमीतकमी सभासद संख्या चार असून ती १९८९-९० ते १९९१-९२ या तीन वर्षांतील आहे तर त्यांची थकबाकी वेगवेगळी आहे.

३) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील एकूण थकबाकी विचारात घेतल्यास सरासरी थकबाकी रु. १,०६,५५७ आहे. ही थकबाकीची सरासरी एकूण थकबाकी व वर्षांची संख्या यांचेशी निगडीत आहे. तसेच याच काळातील एकूण सभासद पाहिल्यास सरासरी सभासद संख्या १७२ इतकी आहे.

४) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील उद्योगाप्रमाणे थकबाकीची रचना पाहिल्यास वास उद्योगाचा प्रथम क्रमांक असून या उद्योगाकडील थकबाकी रु. ५,८७,३८० आहे. कुंभार उद्योगाचा दुसरा क्रमांक असून थकबाकी रु. ५,७९,०५० इतकी आहे तर चर्मोद्योगाचा तिसरा क्रमांक दिसून येतो. या उद्योगातील थकबाकी रु. ३,८८,३०० आहे. सुतार-लोहार उद्योग चौथ्या क्रमांकावर असून थकबाकी रु. २,८९,१६० आहे.

५) या काळातील उद्योगाप्रमाणे थकबाकी पाहिल्यास वेत व बांबू उद्योगाचा पाचवा क्रमांक असून थकबाकी रु. ४८,४५० आहे तर इतर उद्योगाची त्या सालोसाल थकबाकी असून ती रु. २५,६८३ आहे व वरील काळातील

उद्योगाप्रमाणे एकूण सभासद संख्या पाहिल्यास ती क्रमानुसार वाख उद्योग - १,६२५, चर्मोद्योग - ५४४, सुतार-लोहार उद्योग - ३५५, कुंभार उद्योग - ३२२, वेत व बांबू उद्योग - १८३ व इतर उद्योग - ६४ अशी दिसून येते.

६) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील एकूण थकबाकी रक्कम रु. १९,१८,०२३ असून एकूण सभासद संख्या ३,०९३ इतकी आहे. तसेच प्रत्येक वर्षातील सरासरी थकबाकी पाहिल्यास जास्तीतजास्त थकबाकी १९९१-९२ या वर्षातील असून ती रु. २,७५० आहे तर कमीतकमी सरासरी थकबाकी १९७६-७७ या वर्षातील असून ती रु. ३७४ आहे. ही थकबाकी सरासरी त्या त्या वर्षातील सभासद संख्या व त्या त्या वर्षातील थकबाकी यांच्याशी निगडित आहे.

७) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील उद्योगाप्रमाणे थकबाकीची टक्केवारी पुढीलप्रमाणे दिसून येते.

अनु.	उद्योग	एकूण थकबाकी	टक्केवारी
१)	चर्मोद्योग	३,८८,३००	२०.२४
२)	कुंभार उद्योग	५,७९,०५०	३०.१८
३)	सुतार-लोहार उद्योग	२,८९,१६०	१५.०७
४)	वाख उद्योग	५,८७,३८०	३०.६२
५)	वेतन्न बांबू उद्योग	४८,४५०	२.५२
६)	इतर उद्योग	२५,६८३	१.३३
	एकूण :	१९,१८,०२३	९९.९६

वरील कोष्टकावरून थकबाकीच्या टक्केवारीची रचना उद्योगाप्रमाणे पाहिल्यास वाख उद्योग व कुंभार उद्योगाची टक्केवारी ६०.७८ इतकी असून ती इतर सर्व उद्योगांच्या एकत्रित टक्केवारीपेक्षा जास्त आहे.

८) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील थकबाकीच्या सभासदांची टक्केवारी उद्योगाप्रमाणे पाहिल्यास ती पुढीलप्रमाणे दिसून येते.

अनु.	उद्योग	एकूण सभासद	टक्केवारी
१)	चर्मोद्योग	५४४	१७.५८
२)	कुंभार उद्योग	३२२	१०.४१
३)	सुतार-लोहार उद्योग	३५५	११.४७
४)	वाख उद्योग	१६२५	५२.५३
५)	वेत व बांबू उद्योग	१८३	५.९१
६)	इतर उद्योग	६४	२.०६
	एकूण :	३०९३	९९.९६

वरील कोष्टकावरून थकबाकीच्या सभासदांची टक्केवारी पाहिल्यास वाख उद्योगांची टक्केवारी इतर सर्व उद्योगांच्या तुलनेत जास्त असून ती टक्केवारी ५२.५३ इतकी आहे.

४.८.३ <u>उद्योगाप्रमाणे थकबाकीची वैशिष्ट्ये</u> :

अ) <u>चर्मोद्योग व थकबाकी</u> -

१) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगातील थकबाकीची रचना पाहिल्यास सर्वात जास्त थकबाकी १९८८-८९ या वर्षातील असून ती रु. ७१,५५०, ही ७२ सभासदांची आहे. या उद्योगातील कमीतकमी थकबाकी रु. २,००० असून ती एका सभासदाकडील १९९१-९२ या वर्षातील आहे.

२) वरील काळातील सभासदांची रचना पाहिल्यास सर्वात जास्त सभासद संख्या १९८८-८९ या वर्षातील असून ती ७२ इतकी आहे तर त्यांची

थकबाकी रु. ७१,५५० आहे. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या १९९१-९२ या वर्षातील असून ती फक्त एक आहे.

३) वरील काळातील एकूण थकबाकी पाहिल्यास सरासरी थकबाकी रु. २२,८४१ आहे तर सरासरी सभासद संख्या ३२ इतकी आहे.

ब) कुंभार उद्योग व थकबाकी -

१) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगातील थकबाकी पाहिल्यास जास्तीत जास्त थकबाकी १९८८-८९ या वर्षातील असून ती रु. १,३०,५५० ही ४९ सभासदांची आहे तर कमीतकमी थकबाकी १९७४-७५ या वर्षातील असून ती रु. १,२०० ही तीन सभासदांकडील आहे.

२) वरील काळातील सभासद संख्या पाहिल्यास जास्तीतजास्त सभासद १९८८-८९ या वर्षातील असून ते ४९ इतके आहेत तर कमीतकमी सभासद संख्या १९७४-७५ या वर्षातील असून ती फक्त तीन आहे.

३) वरील काळातील उद्योगातील एकूण थकबाकी पाहिल्यास सरासरी थकबाकी रु. ३६,१९१ आहे तर सरासरी सभासद संख्या २० आहे. १९९०-९१ पासून या उद्योगाची थकबाकी दिसून येत नाही.

क) सुतार-लोहार उद्योग व थकबाकी -

१) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगाची थकबाकी रचना पाहिल्यास सर्वात जास्त थकबाकी रु. ४३,५०० असून ती १९८७-८८ मधील असून ती ४० सभासदांची आहे तर कमीतकमी थकबाकी ही १९७४-७५ या वर्षातील असून ती रु. १,२५० ही पाच सभासदांकडील आहे.

२) अभ्यास काळातील या उद्योगातील सभासद संख्या पाहिल्यास जास्तीतजास्त सभासद ४० असून ते १९८७-८८ या वर्षातील आहेत. या उद्योगातील कमीतकमी सभासद संख्या १९९०-९१ या वर्षातील असून ती फक्त दोन आहे तर त्यांचेकडील थकबाकी रु. ६,००० आहे.

३) वरील काळातील थकबाकी पाहिल्यास या उद्योगातील सरासरी थकबाकी रु. १७,०१० असून सरासरी सभासद २१ इतके आहेत.

ड) वास उद्योग व थकबाकी -

१) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगातील थकबाकी पाहिल्यास सर्वात जास्त थकबाकी १९८६-८७ या वर्षातील असून ती रु.६४,५५० ही १७३ सभासदांकडील आहे तर कमीतकमी थकबाकी १९७४-७५ या वर्षातील असून ती रु. १७,५०० ही ३३ सभासदांची आहे.

२) अभ्यास काळातील सभासद रचना पाहिल्यास सर्वात जास्त सभासद १७३ असून ते १९८६-८७ ते १९८८-८९ या तीन वर्षातील आहेत. तर कमीतकमी सभासद संख्या ३३ असून ती १९७४-७५ या वर्षातील आहे.

३) अभ्यास कालखंडात या उद्योगातील एकूण थकबाकी पाहिल्यास सरासरी थकबाकी रु. ३९,१५९ तर सरासरी सभासद संख्या १०८ इतकी आहे. १९८९-९० पासून या उद्योगाची थकबाकी दिसून येत नाही.

इ) वेत व बांबू उद्योग व थकबाकी -

१) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगातील थकबाकीच्या आकडेवारीची रचना पाहिल्यास सर्वात जास्त थकबाकी १९८६-८७ व १९८७-८८ या वर्षातील असून ती रु. ७,३०० प्रत्येकी २३ सभासदांकडील आहे. या उद्योगातील कमीतकमी थकबाकी १९७४-७५ या वर्षातील असून ती रु. ९५० ही पाच सभासदांकडील आहे.

२) अभ्यास कालातील सभासद संख्या पाहिल्यास सर्वात जास्त सभासद १९८६-८७ व १९८७-८८ या वर्षातील असून ते २३ इतके आहेत तर कमीतकमी सभासद संख्या १९७४-७५ या वर्षातील असून ती पाच इतकी आहे.

३) वरील कालातील थकबाकी पाहिल्यास सरासरी थकबाकी रु.३,२३० तर सरासरी सभासद संख्या १२ इतकी आहे. या उद्योगाची १९८९-९० पासून थकबाकी दिसून येत नाही.

फ) इतर उद्योग व थकबाकी -

१) १९७४-७५ ते १९९१-९२ या काळातील या उद्योगाची थकबाकी पाहिल्यास सर्वात जास्त थकबाकी १९८०-८१ या वर्षातील असून ती रु.३,१५० ही सात सभासदांकडील आहे तर कमीतकमी थकबाकी रु.५०० ही एका सभासदाकडील १९७५-७६ ते १९७७-७८ या तीन वर्षातील आहे.

२) वरील कालातील सभासद संख्या पाहिल्यास सर्वात जास्त सभासद संख्या सात इतकी असून ती १९८०-८१ ते १९८४-८५ या पाच वर्षातील आहे तर कमीतकमी सभासद संख्या एक असून ती १९७५-७६ ते १९७७-७८ या वर्षातील आहे तर त्यांची थकबाकी रु. ५०० आहे.

३) अभ्यास काळातील एकूण थकबाकी पाहिल्यास सरासरी थकबाकी रु. १,८३४ असून सरासरी सभासद संख्या पाच इतकी आहे.

४.९ मूल्यमापन :

प्रकरण चारमध्ये वाळवा तालुका कारागिर विकास संघाने १९७२-७३ ते १९९१-९२ या कालखंडात केलेल्या प्रगतीची वाटचाल स्पष्ट केली आहे. १९७२-७३ ते १९९१-९२ या २० वर्षांच्या काळातील संघाच्या प्रगतीचा सर्वसाधारण आढावा घेणे हे आमच्या अभ्यासाचे प्रमुख उद्दिष्ट आहे. संघाने केलेली प्रगती म्हणजे चर्मोद्योग, कुंभार उद्योग, सुतार-लोहार उद्योग, वास उद्योग, वेत व बांबू उद्योग व इतर उद्योग (लोकर उद्योग, ग्रामीण तेल घाणी उद्योग व धान्य डाळी प्रक्रिया उद्योग) यासारख्या ग्रामीण भागात रोजगार निर्माण करणाऱ्या आणि आर्थिकदृष्टया दुर्बल घटकांना मदतीचा हातभार लावण्याचा प्रयत्न होय. यात संघाने केलेले कर्ज वाटप, कर्ज वसुली, येणे बाकी व थकबाकी या बाबींचा प्रामुख्याने समावेश होतो. या बलुतेदारांना मिळालेल्या अनुदानांचा विचार स्वतंत्रपणे प्रकरण ५ मध्ये केला आहे. या प्रकरणाचा अभ्यास करताना प्रकर्षाने दिसून आलेली वैशिष्टये पुढीलप्रमाणे आहेत.

१) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील सर्व उद्योगांना मिळून केलेले कर्ज वाटप हे रु. ८३,३०,४५५ इतके आहे. या कर्ज वाटपात सर्वाधिक कर्ज वाटप १९८५-८६ या वर्षातले असून ते रु. ७,५३,०६४ आहे. यास वैशिष्ट्य म्हणण्याचे कारण असे की, हे कर्ज वाटप ६७१ बलुतेदारांना केले असून त्यात ही सर्वाधिक बलुतेदार कारागिर वास उद्योगातील आहेत.

२) एकूण कर्ज वाटपाची एकत्रित आकडेवारी पाहिली तर संघाने केलेले कर्ज वाटप प्रतिवर्षी रु. ४,१६,५२३ आहे. तालुका पातळीवरील संघाकडून फक्त बलुतेदारांना वाटप झालेले कर्ज वाटप म्हणून या आकडयाकडे पाहिल्यास तो समाधानकारक आहे. कारण या आकडयापेक्षा तो ज्या स्तरातील दुर्बल घटकाला वाटला गेला आहे तो स्तर (Weaker section of the society) आपल्या अभ्यासाच्या दृष्टीने महत्वाचा आहे.

३) संघातून गेल्या २० वर्षात १०,७६० सभासदांना कर्ज वाटप झाले असून सरासरी सभासद संख्या ५३८ इतकी येते. याचा अर्थ सरासरीने प्रतिवर्षी ५३८ सभासदांना संघाच्या कर्ज वाटपाचा लाभ मिळालेला दिसतो.

४) उद्योगानुसार कर्ज वाटपाची आकडेवारी पाहिली तर कुंभार उद्योगास केलेले कर्ज वाटप सर्वात जास्त आहे. त्या पाठोपाठ चर्मोद्योगाचा दुसरा क्रमांक लागतो. १९७२-७३ ते १९८३-८४ या काळात चर्मोद्योगास केलेले कर्ज वाटप एखाद्या वर्षाचा अपवाद वगळता सर्वाधिक आहे. चर्मोद्योगानंतर कुंभार उद्योगाचा दुसरा क्रमांक लागतो तर वास उद्योगाचा तिसरा क्रमांक लागतो.

५) कर्ज वाटपातील त्रुटी म्हणून धान्य डाळी प्रक्रिया उद्योग, ग्रामीण तेल उद्योग आणि लोकर उद्योग या उद्योगांची नावे सांगता येतील. या उद्योगांना झालेले कर्ज वाटप २० वर्षांचा आढावा घेतल्यानंतर असे दिसते की, हे कर्ज अत्यंत कमी किंवा नगण्य स्वरूपाचे आहे. या कर्ज वाटपाची कल्पना तक्ता क्रमांक ४.१ वरून येते. धान्य डाळी,प्रक्रिया उद्योग हा कोणत्याही एका विशिष्ट समाजाशी निगडीत नसल्यामुळे आणि खाजगी क्षेत्रात हा उद्योग मोठया प्रमाणात केला जात असल्यामुळे संघाकडून या उद्योगाला फक्त एकाच वर्षी व फक्त रु. ५०० कर्ज पुरवठा एकाच सभासदास झाला आहे.

६) लोकर उद्योगास हो कर्ज वाटप कमी असल्याचे दिसून येते कारण हा उद्योग प्रामुख्याने धनगर समाजाकडून केला जातो. या वर्गाचे वैशिष्ट्य म्हणजे हा समाज वर्षातील काही महिने फिरतीवर असतो त्यामुळे संघाकडून अशाप्रकारची कर्जे घेण्याविषयीच हा समाज अविभिज्ञ असतो.

७) ग्रामीण तेल उद्योगाचे कर्ज वाटप हे ही नगण्य स्वरूपाचे दिसून येते कारण हा व्यवसाय जरी तेली समाजाशी निगडित असला तरी हा व्यवसाय खाजगी क्षेत्रात मोठ्या प्रमाणावर केला जातो. याशिवाय अलीकडील काळाचा विचार करता आधुनिक सुविधांच्या सोयी उपलब्ध झाल्यामुळे विद्युत उपकरणांचा वापर वाढला आहे. त्यामुळे या ही उद्योगास नगण्य स्वरूपाचे कर्ज वाटप झाल्याचे दिसते.

८) १९७३-७४ ते १९९१-९२ या काळातील कर्ज वसुलीची रचना पाहिल्यास सर्वात जास्त कर्ज वसुली चर्मोद्योगाची व कुंभार उद्योगाची आहे तर सर्वात कमी कर्ज वसुली वाख व इतर उद्योगाची आहे.

९) वाख उद्योगाचे कर्ज वाटप पाहता इतर सर्व उद्योगांच्या तुलनेने वाख उद्योगाची कर्ज वसुली कमी प्रमाणात आहे. याचे कारण म्हणजे या उद्योगातील कर्ज वाटप प्रामुख्याने मांग समाजास केले जात असून या समाजातील कारागिरांची कर्जफेडीची प्रवृत्ती फारच कमी प्रमाणात आहे.

१०) १९७२-७३ ते १९९१-९२ या काळातील येणे बाकी पाहिल्यास कुंभार उद्योगाची जास्त असली तरी वाख उद्योगाच्या सभासद संख्येच्या तुलनेत या उद्योगाची सभासद संख्या कमी आहे.

११) संघाच्या सभासदाच्या थकबाकीची रचना पाहिल्यास वाख उद्योगाची थकबाकी सर्वात जास्त असून सभासद संख्या ही सर्वात जास्त आहे.

१२) संघातील थकबाकीचा विचार केल्यास वाख उद्योगानंतर कुंभार उद्योगाचा क्रमांक लागतो. मात्र सभासद संख्येच्या दृष्टीने चर्मोद्योगाचा दुसरा क्रमांक लागतो.